आजचा सुविचार

अगदी सरळमार्गी असणे हेही एक प्रकारचे पापच आहे. हे पाप कालांतराने मनुष्याच्या दुर्बलतेचे कारण बनते...

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३३९

पाने : ०४, किंमत : ०३ रुपये

संपादक : विनोद कैलास गोरे

RNI NO. : MAHMAR/2022/82056

Follow Us On : www.aksharaj.com

Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२० जुलै २०२५


## घरातील पोत्याखाली आढळली नागाची जोडी, त्यानंतर एकामागून एक निघाली २१ पिल्लं



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील रामटेक वनपरिक्षेत्रात एक धक्कादायक घटना घडली. चाचेर गावात एका शेतात चक्क २१ नाग सापडले. पावसाळ्यामुळे सापांचा वावर वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतात काम करताना विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पाहता पाहता २१ नाग पिल्ले आढळली !**

रामटेक वनपरिक्षेत्रातील चाचेर गावात नितेश ठोसरे यांच्या शेतात ही घटना घडली. त्यांच्या शेतातील झोपडीत औषधांच्या पोत्याखाली साप दिसला. त्यांनी तातडीने सर्पमित्रांना बोलावले. वाईल्ड कॅलेंडरच्या सदस्यांनी सापाला पकडले. तेव्हा त्यांना आणखी एक साप दिसला. पाहता पाहता तिथे २१ नाग पिल्ले आढळून आली. या घटनेची माहिती तात्काळ रामटेक वन विभागाला देण्यात आली. वन विभागाने पंचनामा केला. नागिणीच्या जोडीसह २१ पिल्लांना सुरक्षितपणे पकडण्यात आले. त्यांना जंगलात सोडण्यात आले. पावसाळ्यात साप आणि इतर सरपटणारे प्राणी सुरक्षित जागा शोधतात. ते मोकळ्या जागा, झोपड्या किंवा पिकांच्या भागात लपतात. त्यामुळे शेतात काम करताना शेतकऱ्यांनी अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. शेतात काम करतांना सावधान, पावसाळा सुरू असून शेतात साप निघण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे काम करताना खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे, असे वन विभागाने सांगितले.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

### गणेश मंडळांनी स्पर्धेत सहभाग नोंदवण्याचे आवाहन

* सांस्कृतिक कार्य विभागाचा उपक्रम

* ५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, बुलडाणा :** पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच दि. २० जुलै २०२५ पासून दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

सदर स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

२७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सव स्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु.२५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांना युरिया खत तातडीने उपलब्ध करून द्या – राम इढोळे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, वाशीम :** तालुक्यातील शेतकऱ्यांना युरिया खत तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते राम इढोळे यांनी केली आहे. सध्या शेतकरी विविध संकटात सापडले असून, पिकांना योग्य हमीभाव मिळत नाही, आर्थिक अडचणी वाढत आहेत आणि नैसर्गिक संकटांचाही सामना करावा लागत आहे.

शेतकऱ्यांचे पिक सध्या वाढीच्या टप्प्यावर असून, युरिया खताची अत्यंत गरज आहे. मात्र, वाशीम तालुक्यात युरिया खताचा तुटवडा निर्माण झाला असून, त्यामुळे पिकांची वाढ खुंटली आहे आणि उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांच्या या गंभीर समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे आणि वाशीम तालुक्यात युरिया खत पुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी राम इढोळे यांनी केली आहे.

## 'दोन्ही शिवसेना एकत्र येतील अशी आशा' : अंबादास दानवे



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आक्रमक नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा विधान परिषदेचा कार्यकाळ ऑगस्ट महिन्यात संपत आहे. याच पार्श्वभूमीवर पावसाळी अधिवेशनात अंबादास दानवे यांचा निरोप समारंभ विधान परिषदेत पार पडला. त्यांच्या निरोप समारंभाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित होते. दानवेंच्या निरोप समारंभाच्या भाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना खोचक टोला लगावला होता. त्यावर ठाकरेंनी देखील प्रत्युत्तर दिलं होतं. तसेच अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभाच्या फोटोसेशन वेळी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी एकमेकांकडे पाहणं टाळलं होतं आणि बाजूला बसणं देखील टाळलं होतं. पण अंबादास दानवे यांना दोन्ही शिवसेना एकत्र येतील अशी आशा आहे. तसं वक्तव्य दानवे यांनी केलं आहे.

अंबादास दानवे यांनी 'एबीपी माझा'ला दिलेल्या मुलाखतीत संबंधित वक्तव्य केलं आहे. अंबादास दानवे यांना दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात असं तुम्हाला वाटतं का? असा प्रश्न अंबादास दानवे यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येतील अशी आशा आहे, असं मोठं वक्तव्य केलं आहे.

**अंबादास दानवे नेमकं काय म्हणाले?**

मी तेवढा मोठा नाहीय. पण निश्चित मी त्यादिवशी सुरुवातीलाच म्हटलं की, मनाला वेदना झाल्या. जी संघटना अखंड ताकदवान होती, ठीक आहे, सत्तेत बसणं वगैरे, आम्ही काय सत्तेसाठी जन्माला आलेलो नाहीत. सत्ता येईल आणि जाईल. पण जी संघटना फुटली त्याच्या वेदना मनाला आणि हृदयाला झालेल्याच होत्या. या वेदना कधीना कधी भरुन निघाव्यात असं मनाला वाटत असतं. सगळे एकत्र असले पाहिजे. सगळे लोकं असले पाहिजेत. कारण आपल्या शिवसेनेचं राज्य असलं पाहिजे. आपली महाराष्ट्रात ताकद असली पाहिजे, असं मला शिवसैनिक म्हणून वाटतंच. आशा ठेवायला काही हरकत नाही, अशी प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली.

मी कुणाविषयी वैयक्तिक सल ठेवणार नाही. पण मनाला ही सल कायम आहे की, आपली एवढी मजबूत संघटना कुणीतरी फोडली. तिला कुणाची तरी दृष्ट लागली. संघटना तेवढीच मजबूत व्हावी हीच माझी इच्छा आहे, असं अंबादास दानवे म्हणाले.

## मँचेस्टर कसोटीवर भारताचे भवितव्य अवलंबून...



भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथा सामना २३ ते २७ जुलै दरम्यान मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर होणार आहे. या सामन्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे कारण जर भारत हा सामना हरला, तर ट्रॉफी हातातून निसटेल. त्यामुळे शुभमन गिल आणि संघासाठी हा सामना 'करो या मरो' सारखा ठरणार आहे.

**बुमराह खेळणार का चौथी कसोटी?**

एंडरसन-तेंडुलकर ट्रॉफी सुरू होण्याआधी बीसीसीआयने वैद्यकीय सल्ल्यानुसार निर्णय घेतला होता की जसप्रीत बुमराह फक्त तीन सामने खेळेल. त्याने त्यापैकी दोन सामने आधीच खेळले आहेत आणि तिसरा सामना शिल्लक आहे. मँचेस्टरची कसोटी निर्णायक ठरणार आहे आणि त्यामुळे बुमराहच्या सहभागी होण्याची शक्यता मोठी आहे. जर भारताला ऐतिहासिक मालिका जिंकायची असेल, तर बुमराहचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरेल. मात्र, त्याच्या वर्कलोडमुळे चाहत्यांमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत काहींना वाटते की त्याला विश्रांती द्यावी, तर काहींना वाटते की जर तो फिट असेल, तर सर्व सामने खेळले पाहिजेत.

**आकाश चोप्राचा सल्ला !**

या चर्चेत आता माजी सलामीवीर आकाश चोप्रानेही आपली प्रतिक्रिया दिली आहे. आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना तो म्हणाला, बुमराहने मँचेस्टरचा सामना नक्की खेळावा. त्यानंतर ठरवा की शेवटचा सामना खेळायचा की नाही.

तो पुढे म्हणाला, माझं मत आहे की गरज भासली तर त्याने चौथा नव्हे तर पाचवाही सामना खेळावा. त्यानंतर त्याला दीड महिन्याचा ब्रेक मिळेल. एशिया कप होतो की नाही, हेही ठरलेलं नाही. संपूर्ण ऑगस्ट महिना मोकळा आहे. सप्टेंबरमध्ये परत ये. नको वाटत असेल तर एशिया कपलाही खेळू नकोस. पण ही टेस्ट मालिका जिंकून दे, हे खूप महत्त्वाचं आहे.भारतीय संघासाठी मँचेस्टर कसोटी निर्णायक ठरणार आहे. जसप्रीत बुमराहच्या उपस्थितीचा निर्णय त्याच्या फिटनेस आणि टीम स्ट्रॅटेजीवर अवलंबून असेल. पण एक गोष्ट निश्चित आहे जर भारताला ही ट्रॉफी जिंकायची असेल, तर संघातील सर्व खेळाडूंनी सर्वोत्तम प्रदर्शन करणे अत्यंत गरजेचे आहे.

## केवायसी नाही, रेशनही नाही! आधार लिंक करा अन्यथा...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नाशिक :** रेशन दुकानांमधून दरमहा न चुकता स्वस्त धान्य घेणारे लाभार्थी वारंवार आवाहन करूनही ई-केवायसी करून घेत नसल्याची पुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेतली आहे. ३१ जुलैपर्यंत केवायसी न करणाऱ्या लाभार्थींचे धान्य वितरण सप्टेंबरपासून कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहे. 'नो केवायसी-नो रेशन' असा इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत अधिक पारदर्शकता यावी यासाठी केंद्र सरकारने स्वस्त धान्याचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक लाभार्थीला रेशनकार्डला आधारकार्ड जोडणे बंधनकारक केले आहे. समाजातील शेवटच्या गरजवंताला स्वस्त धान्याचा लाभ मिळावा, हा या ई-केवायसीचा उद्देश आहे. रेशनकार्डवर नाव असणाऱ्या प्रत्येक लाभार्थीने रेशन दुकानदाराकडे जाऊन आपल्या आधारकार्डची झेरॉक्स सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी प्रारंभी एप्रिलपर्यंत, नंतर जुलैअखेरपर्यंत मुदत देण्यात आली. तरीही हजारो लाभार्थींचे केवायसी बाकी आहे. या पार्श्वभूमीवर प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.१६) व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आढावा घेण्यात आला. वारंवार आवाहन करूनही लाभार्थी ई-केवायसी करीत नसल्याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. यापुढे ई-केवायसीला मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सप्टेंबरनंतर ई-केवायसी न झालेले लाभार्थी आढळल्यास ते अस्तित्वात नाहीत असे समजण्यात येईल. अशा लाभार्थींचे धान्य बंद करण्यात येणार आहे. ई-केवायसी झालेल्या लाभार्थ्यांनाच सप्टेंबरपासून धान्य मंजूर होणार आहे. अन्य लाभार्थी धान्यापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांची असणार आहे. याशिवाय स्थानिक लोकप्रतिनिधींकडून तक्रारी झाल्यास त्याची जबाबदारीही संबंधित अधिकाऱ्यांची असेल, असा इशारा पुरवठा विभागाच्या उपायुक्त प्रज्ञा बडे मिसाळ यांनी नाशिकसह धुळे, जळगाव, अहिल्यानगर आणि नंदुरबार येथील जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिला आहे.

सिन्नर : तालुक्यातील ३४ हजार ६१५ लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित असून त्यांनी तात्काळ ती करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार सुरेंद्र देशमुख, पुरवठा निरीक्षण अधिकारी विवेक जमधडे यांनी केले आहे. स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत तसेच विविध माध्यमांद्वारे सूचित करूनही काही लाभार्थी ई-केवायसी करण्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. सूचना देवूनही ई-केवायसी करण्यास ते दुकानात येत नाही, अशी खंत तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार व्यक्त करतात. मात्र, कमी ई-केवायसीसाठी स्वस्तधान्य दुकानदार यांच्यावरच जबाबदारी निश्चित होणार असल्याने सर्व लाभार्थ्यांनी ३१ जुलै २०२५ पर्यंत ई-केवायसी पूर्ण करून रास्तभाव दुकानदार तसेच शासनास सहकार्य करावे. माहे सप्टेंबरपासून अशा लाभार्थ्यांचे धान्य बंद झाल्यास त्याला लाभार्थी स्वतःच जबाबदार राहतील, अशी ताकीद पुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

## सिंगल फेजसाठी शिवसेना आक्रमक ; नवीन फॉल्टी मीटर विरोधात जन आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंगल फेज विद्युत पुरवठा मिळत नसल्याने तसेच नवीन फॉल्टीमीटर च्या विरोधात शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली असून वीस ग्राहकांच्या न्यायासाठी उबाठा शिवसेनेच्या वतीने जन आंदोलन छेडण्याचा इशारा लेखी निवेदना द्वारे महावितरण कंपनीला देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना फक्त ८ तास थ्री फेज वीज पुरवठा केला जातो. परंतु १६ तास शेतातील आखाड्यावर विद्युत पुरवठा नसल्याने अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. सध्या बिबट्या अवतरला असल्याने अंधारामुळे त्याने अनेक जनावरांचा पडशा पडला आहे. यांमुळे आखाड्यावर सालगडी राहत नसून रात्रीच्या वेळेला शेतात कुणीही काम करण्यास तयार नाही. शेतीला जोड व्यवसाय म्हणून कुक्कुटपालन दुग्धव्यवसाय शेळीपालन, वराह पालन यावर परिणाम होत आहे. सिंगल फेज सुरू करण्यात यावे अशी मागणी उबाठा गटाच्या शिवसेना कार्यकर्त्यांनी केली असून आक्रमक भूमिका घेतली आहे.

तालुक्यात सध्या नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम जोमात सुरू आहे. या नावाखाली वीस ग्राहकांची मोठी लूट केली जात आहे. नवीन मीटर बसविताना जुने मीटर फॉल्टी असल्याचे सांगून पैसे उखळण्याचे प्रकार सर्रास सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जबरदस्तीने स्मार्ट नवीन मीटर बसून ग्राहकांना वेट इज धरले जात आहे. एकीकडे शासन थरावर मीटर बसवणे बंधन कारक नसल्याचे सांगितले जात असले तरी नवीन मीटर बसविणाऱ्या कंपन्या शक्ती करताना दिसत आहे. नवीन मीटर सुद्धा फोल्टी असल्याचे दाखवून छेडछाड केल्याच्या नावाखाली दंड आकारला जात आहे.

या विरोधात उबाठा शिवसेनेने महावितरण कंपनीच्या विरोधात जन आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या आशियाचे लेखी निवेदन सहाय्यक अभियंता मुदखेड यांना देण्यात आले आहे. या निवेदनावर उबाठा शिवसेना तालुका संघटक माधव पावडे, सर्कल प्रमुख विजय देशमुख बारडकर, मयूर देशमुख, प्रशांत पाटील, शेख सतार, आनंद कांबळे, यांच्यासह शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय



### गुंठेवारीचे पीक!

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बहुचर्चित तुकडाबंदी कायदा शिथिल करण्याची घोषणा करून राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा दिला. शहरी भाग आणि गावठाणापासून दोनशे मीटर अंतरावरील १ जानेवारी २०२५ पर्यंतचे जमिनीच्या छोट्या तुकड्यांचे व्यवहार त्यामुळे नियमित होतील. विधिमंडळाने कायदा दुरुस्तीची मोहोर उमटविल्यानंतर अगदी एक गुंठ्यापासून प्रलंबित असलेली गुंठेवारीची पन्नास लाख प्रकरणे मार्गी लागतील. विहीर, शेतरस्ता, मोजणीत अतिरिक्त भरणाऱ्या क्षेत्रांची अदलाबदल आदी कारणांबाबत या निर्णयाचा शेतकरीवर्गाला लाभ होईल, असे सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र राज्याच्या बऱ्याच भागांत दलाल, गुंतवणूकदारांसह तत्सम घटकांचे फावणार आहे.

शेतजमिनीचे लहान-लहान तुकडे होऊ नयेत, किफायतशीर शेतीत अडचण येऊ नये, हा तुकडाबंदीचा उद्देश. वारसाहक्क वा इतर कारणांमुळे जमिनीचे तुकडेकरण रोखण्यासाठी १९४७मध्ये हा कायदा आणला गेला. परंतु, त्यातील पळवाटा शोधून राज्यात छोट्या जमिनींचे व्यवहार होत राहिले. शासनानेही वेळोवेळी कायद्यात दुरुस्त्या करून अनधिकृत प्रकरणे अधिकृत ठरवली. महसूलपासून मंत्रालयापर्यंत दलाल-विकासकांची साखळी असल्याने हे घडले. शहरे व मोठ्या गावांलगतच्या शेतकऱ्यांना त्या-त्या वेळच्या निर्णयांचा काही प्रमाणात लाभ झाला. परंतु, कृषक जमिनीच्या तुकडेकरणाकडे सरकार दुर्लक्ष करीत गेले. तेथे उभ्या राहणाऱ्या अनधिकृत बांधकामांकडेही काणाडोळा केला गेला. शहरे आणि गावांमध्ये शेतजमिनींचे दर वाढत गेले तशी गुंठेवारीने अधिक उचल खाल्ली.

चार-पाच वर्षांपूर्वी जिरायतीसाठी वीस गुंठे, तर बागायतीसाठी दहा गुंठ्यांच्या खरेदी-विक्रीला सरकारने परवानगी दिली; परंतु तुकडाबंदी कायद्याचे आणखी बऱ्याचदा तुकडे होतील, याची गुंठेवारी लॉबीला पुरेपूर कल्पना असावी. त्यामुळे सुरुवातीला रेडीरेकनरच्या पाच टक्के, नंतर पंचवीस टक्के शुल्क आकारून अशा भूखंडांचे नियमितीकरण करण्याच्या मोहिमेला प्रतिसाद मिळाला नाही. आता तुकडाबंदी कायदाच रद्द होणार असल्याने शुल्क भरून बांधकामे नियमित करण्याचे नियम आपसूकच केराच्या टोपलीत जातील. मोठ्या लोकसंख्येची गावे, राज्य-महामार्गांलगतही तुकडेकरणाला परवानगी दिली जाऊ शकते. मोठ्या आर्थिक उलाढाली होत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वीच हा विषयसुद्धा संपवला जाईल. सरकारच्या 'एसओपी' पंधरा दिवसांतच त्याचा निकाल लावू शकते. एक आणि दोन गुंठ्यांचे मालकी हक्क तयार होऊन वाढणाऱ्या गुंतागुंतीची मात्र कोणालाही फिकीर नाही.

नाशिक जिल्ह्यात नियमित होणारे भूखंड, दलालांनी आधीच ग्राहकांना अनधिकृतरीत्या विकलेले आहेत. एका गुंठ्यासाठी चार ते दहा-बारा लाख रुपयांपर्यंतची किंमत ग्राहकांनी मोजली. महागडे फ्लॅट वा अकृषक जागा घेणे शक्य नसल्याने गुंठेवारीने खरेदी करणाऱ्यांत परप्रांतीय बहुसंख्य आहेत. या छोट्या भूखंडांवर वसाहती निर्माण झाल्या आहेत. ही घरेसुद्धा आज-उद्या नियमित होतील, याची खात्री दलाल व गुंतवणूकदारांच्या 'तुकडे गँग'ला आहेच. सद्यस्थितीत या जागा मूळ शेतकऱ्यांच्याच नावे असल्याने व्यवहार शेतकरी ते ग्राहक असेच होतील. मलिदा मात्र मधली साखळी खाऊन जाईल. शेतकऱ्यांकडून जमीन विकत घेऊन, तिचे तुकडे करून, अवैध विक्री करून बक्कळ नफा कमावला जातो. गावागोवी आणि शहरांतही हेच रॅकेट सक्रिय आहे. दलाल, गुंतवणूकदार, स्थानिक पुढारी, लोकप्रतिनिधी आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमतातून शेती संपवली जात आहे. या जागांवर बेसुमार बांधकामे होऊन शहराचा नियोजनबद्ध विकास मोडीत निघू शकतो. बकालपण वाढू शकते. या वसाहतींना रस्ते, पाणी, वीज अशा मूलभूत सुविधा पुरविण्याचे आव्हान स्थानिक स्वराज संस्थांसमोर उभे आहे. वास्तविक, गुंठेवारीचे धोरण सुस्पष्ट व दूरदृष्टीचे असावे. परवानगीचे निकष ठोस हवेत; अन्यथा 'पहिले पाढे पंचावन्न'प्रमाणे शेती संपून गुंठेवारीचे चक्र सुरूच राहील. शहरे सुजत राहतील, बेफाम अस्ताव्यस्त वाढत राहतील!

# ट्रम्प यांच्या हुकुमशाही विरोधात जनता रस्त्यावर



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम सहा महिने झाले. या सहा महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने सहा महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत.

नुकतेच स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली. आंदोलकांनी या आंदोलनाला गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनात लाखो नागरिक रस्त्यावर जमले. सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला. हे आंदोलन शांततेत पार पडले तरी या आंदोलनात आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला. पब्लिक सिटिझन ग्रुपच्या सह - अध्यक्षा लिसा गिल्बर्ट यांनी सांगितले की आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध हे आंदोलन आहे. अर्थात ट्रम्प यांच्या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध अमेरिकन नागरिकांनी केलेले हे पहिलेच आंदोलन नाही. मागील महिन्यातच अमेरिकन नागरिकांनी असेच एक मोठे आंदोलन केले होते. आंदोलकांनी त्या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले होते. ते आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले गेले. त्या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला होता त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील ते आंदोलनही शांततेत पार पडल्याने कोणालाही अटक करण्यात आली नव्हती मात्र त्या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली होती.

आताही तेच झाले. सह महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## दाता...

धावो पाय मदतीला
हाकारा कुणी देता
एकचं इच्छा मनात
बनव निष्काम दाता

सुखे वाटता भरभरू
कापरे भरु नये हाता
घेणारेचेहरे दिसू नये
रे कोण कुठला होता

चघळू चणेलोखंडाचे
कणखर बनवा दाता
रुप मिळो देवदूताचे
प्रसन्न रहावा विधाता

अहंकारस्पर्श न होई
रे श्रेय कसलेही घेता
नामा निराळा राहिला
तो सिकंदर जगत्जेता

आधी कळावे मनाला
संकटकुणावरही येता
कुठल्याही रुपा यावा
तो संकटमोचक त्राता

आधी दिसावा भुकेला
कधीहीघास मी खाता
हक्कज्या त्यास मिळो
घासांच्या प्रत्येक शितो

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# मतलबी दुनियेत नका ठेऊ कोणावर विश्वास!

आजकाल दुनिया मतलबी व बेभरवशाची झाली आहे. कोणावर भरवसा ठेवावा आणि कोणावर भरवसा ठेवू नये? हे कळणे या जमान्यात फार अवघड झाले आहे. ज्याच्यावर मनापासून भरवसा ठेवला तो माणूस कधीतरी विश्वासघात केल्याशिवाय राहत नाही. पृथ्वीतलावर असा कोणताच माणूस नाही की, त्याच्यावर आपण डोळे झाकून विश्वास ठेवावा. प्रत्येकजण कधी ना कधीतरी विश्वासघात करतोच. माणसाला माणसापासून दूर करतोच. फरक एवढाच की, कोणात विश्वासाची पातळी कमी असते तर कोणात जरा जास्त असते. काहीजण भरवसा दाखवून लोकांची मने जिंकतात तर काहीजण विश्वासघात करून जवळची माणसे एका क्षणात दूर करतात. विश्वास दाखवणाऱ्या प्रामाणिक माणसांना खरंच मनापासून सलाम करावा वाटतो पण कधी कधी असे वाटते की, आपल्याला ज्या व्यक्तीने आपले काम प्रामाणिकपणे करून भरवसा दाखवला, ती माणसे सुद्धा पुढे चालून आपल्यासाठी विश्वासघाती निघतात. मग विश्वास कोणावर ठेवायचा आणि विश्वास कोणावर नाही ठेवायचा? हे कळणे खरंच फार अवघड झाले आहे. गावात काही लोक म्हणतात की, हा माणूस फार प्रामाणिक व इमानदार आहे, त्याच्यात विश्वास ठासून भरलेला आहे, त्याने मला कधीच धोका दिला नाही, गावात कधीच कोणाला खोटे बोलले नाही, गावात चांगला व विश्वासू माणूस म्हणून त्याची ओळख आहे. म्हणून बरेचजण त्या माणसावर डोळे झाकून विश्वास ठेवतात. पण कालांतराने त्या माणसाची नियत बदलते. त्याच्यातील स्वार्थी भावना वाढते. स्वार्थ वाढला की ही माणसे स्वार्थापायी कोणाचाही विश्वासघात करतात. कोणत्याही थराला जातात आणि नकळत जवळची माणसे तोडतात. हा खेळ सध्या जगात सर्वत्र सर्रासपणे चालू आहे. म्हणून कोणाची नियत कधी बदलेल आणि कोण कधी विश्वासघात करेल हे काही सांगता येत नाही. कारण आजकाल आपण बघतोय की, स्वतःच्या स्वार्थासाठी कित्येक माणसे विश्वासघात करून जवळची नाते व जवळची माणसे तटातट तोडत आहेत. एका गावात एक माणूस राहत होता. पंचक्रोशीत त्याला इमानदार व विश्वासू माणूस म्हणून ओळखले जायचे. सगळा गाव त्याच्यावर विश्वास ठेवायचा. त्या माणसाने सुद्धा गावात अनेक चांगली कामे करून लोकांचा विश्वास संपादन केला होता. तो माणूस कधीच कोणाला खोटे बोलत नव्हता, कधीच चोरी व लबाडी करत नव्हता. शेतात कष्ट करणे व आलेल्या पैशांत घर प्रपंच चालवणे हा त्याचा रोजचा दिनक्रम होता. पण तो माणूस एकदा निवडणुकीला उभा राहिला होता. त्याला अपक्ष म्हणून गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीला उभे केले होते. पण लोकांचा शब्द होता की, आम्ही तुला निवडून देऊ पण निवडून आल्यावर कोणत्याच पक्षात जायचे नाही. अपक्ष म्हणून पाच वर्षे गावची विकास कामे करायची. गावकऱ्यांना देखील वाटायचे हा माणूस प्रामाणिक व इमानदार आहे, त्याने कधीच कोणाला खोटे बोलून फसवले नाही, कधीच कुठे लबाडी केली नाही. हाच व्यक्ती आपल्या गावासाठी चांगला प्रतिनिधी म्हणून काम करेल. चांगल्या प्रकारे गावाचा विकास करेल, म्हणून गावकऱ्यांनी त्याला ग्रामपंचायतीला उभे केले. आणि प्रचंड बहुमतांनी त्याला निवडून पण दिले. तोच माणूस निवडून आल्यावर काही दिवसातच दुसऱ्या पक्षात घुसला. लोकांनी दिलेला शब्द त्याने मोडीत काढला आणि लोकांचा अपेक्षाभंग केला. लोकांनी त्याच्यावर मोठा विश्वास ठेवून त्याला निवडून दिले...त्याने सुद्धा म्हटले होते की, निवडून आल्यावर मी कोणत्याच पक्षात जाणार नाही...अपक्ष म्हणून जनतेचे काम करणार. हा शब्द त्याने दिला होता. त्याने दुसऱ्या पक्षात प्रवेश केल्यावर लोकांना धक्काच बसला. लोक म्हणायला लागले की, हा माणूस तर असा नव्हता. फार विश्वासू होता. त्याच्यावर सगळा गाव विश्वास ठेवायचा. पण त्याने विश्वासघात कसा केला? कशासाठी केला? हे गावकऱ्यांना अजूनही समजले नव्हते. पण कालांतराने गावकऱ्यांना समजले की, त्याने दुसऱ्या पक्षात जाण्यासाठी खूप पैसा घेतला होता. पैशाच्या लोभापायी त्याने दुसऱ्या पक्षात प्रवेश केला. यावरून असा निष्कर्ष निघतो की, माणसावर कितीही विश्वास ठेवला, त्याला कितीही चांगले म्हटले आणि त्याला दुधाने जरी अंघोळ घातली तरी तो माणूस कधी ना कधी तरी वाईट बनतोच आणि विश्वासघात करतोच. केवळ स्वार्थापोटी त्या माणसाने गावकऱ्यांचा विश्वासघात केला. पैशापुढे तो माणूस झुकला. त्याने सर्व मानसन्मान पैशावर गहाण ठेवला. असेच म्हणावे लागेल. गावकऱ्यांना देखील कळून चुकले असेल की, कोणावरही सहज भरवसा ठेवणे एवढे सोपे नाही. माणसाची नियत कधीही बदलू शकते. माणसाचा विचार बदलला की माणसाचे वर्तन बदलते. सगळा खेळ माणसाच्या विचारसरणीवर अवलंबून असतो. कारण आजकाल दुनियाच तशी निघाली आहे. शाळेतील शिक्षकांवर विश्वास ठेवून आईवडील आपल्या मुलांना शाळेत शिकायला पाठवतात. त्याच शाळेतील बहुतांश शिक्षक विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे न्याय देण्यात व अध्यापन करण्यात हल्ली कुठेतरी कमी पडत आहेत. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील धडे शिकवण्या ऐवजी, विद्यार्थ्यांच्या मनावर संस्काराची पेरणी करण्याऐवजी स्वतःच्या श्रीमंतीचा मोठेपणा सांगतात. अशा शिक्षकांमुळेच शिक्षण क्षेत्राला बट्टा लागत आहे. वैद्यकीय क्षेत्राचा विचार केला तर अनेक लोक डॉक्टरांवर मोठा विश्वास ठेवून आपल्या घरातील आजारी व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये भरती करतात पण हे डॉक्टर महाशय रुग्णांवर उपचार करतात खरा पण त्यासाठी म्हणतात अगोदर पैसा भरपूर भरा. काही डॉक्टर चांगले असतात पण काही डॉक्टर केवळ पैसाच कमावण्यासाठी बसलेले असतात. रुग्णांकडून निघेल तेवढा पैसा काढायचे बघतात. अशा मनमानी पैसा उकळणाऱ्या डॉक्टरांना शासनाने धडा शिकवला पाहिजे. असे डॉक्टर गरीब रुग्णांसाठी फार मोठे संकट आहे. म्हणून आजकाल गरीब रुग्णांना एवढा खर्च पेलणे कठीण जात आहे. आपणच अशा डॉक्टरांना म्हणेल तेवढा पैसा देऊन सवय लावलेली आहे. आता ही सवय मोडीत काढणे काळाची गरज आहे. डॉक्टरांना म्हणेल तेवढा पैसा देऊ नका. एवढा खर्च कसा काय लागतो? काय म्हणून तुम्ही एवढे पैसे घेता? तुम्हाला माणसाची काही सहानुभूती आहे का? असे प्रश्न विचारा आणि घासाघीस करा, ते नक्कीच वठणीवर येतील. पण यांच्यावर मोकळ्या मनाने विश्वास ठेवून आणि म्हणेल तेवढा पैसा देऊन स्वतःला आर्थिक संकटात लोटू नका. सांगायचा मुद्दा असा की, या जगात कोणावरही विश्वास ठेवू नका. बायको असेल, भावकी असेल, मित्रपरिवार असेल, शेजारी असतील, शाळेतील शिक्षक असतील किंवा इतर कोणताही व्यक्ती असेल त्यांच्यावर मोकळ्या मनाने विश्वास ठेवून स्वतःला पश्चाताप करून घेऊ नका. कोणाला मनातील गुपित गोष्ट सांगू नका...दुसऱ्याविषयी तिसऱ्या जवळ काही बोलू नका... एखाद्याने सांगितले म्हणून ती गोष्ट करू नका...खात्री करूनच पुढचे पाऊल उचला. एखाद्या गोष्टीचा ठोस पुरावा असल्याशिवाय ती गोष्ट खरी मानू नका...एखाद्याने स्तुती केली म्हणून हुरळून जाऊ नका...खरे काय आणि खोटे काय? हे ओळखायला शिका...या जगात माणूस फक्त स्वतःवरच प्रेम करतो...कितीही जवळचा मित्र झाला तर तो एक दिवस शत्रु पण होऊ शकतो म्हणून मित्रांवर देखील विश्वास ठेवणे फार घातक आहे. कारण आपण वर्तमानपत्रांमध्ये मित्रानेच मित्राला संपवल्याच्या कित्येक बातम्या वाचले आहेत. बापाने मुलाला संपवले, मुलाने आई-वडिलांना संपवले, सख्ख्या भावाने सख्ख्या भावाचा काटा काढला अशा आशयाच्या बातम्या आपण सोशल मीडियावर वाचतो, ऐकतो व पाहतो. लोक म्हणतात की, सख्ख्या भावावर, सख्ख्या बहिणीवर, रक्ताच्या भावकीवर किंवा आई-वडिलांवर डोळे झाकून विश्वास ठेवावा..ते कधीच विश्वासघात करणार नाहीत. परंतु रक्ताच्या नात्यात सुद्धा एकमेकांचा एकमेकांनी विश्वासघात केल्याच्या कित्येक बातम्या आपण रोज वर्तमानपत्रात वाचत आहोत...त्यासाठी तुम्हीच विचार करा आणि ठरवा विश्वास ठेवायचा कोणावर? कारण मी तर म्हणेल या मतलबी दुनियेत नका ठेऊ विश्वास कोणावर!

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जि.लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

